सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

# जिल्हाधिकारी कार्यालय,पुणे ,(आपत्ती व्यवस्थापन शाखा)

दुरध्वनी क्र.020-26123371 E-Mail- homebranchpune@gmail.com

वाचा :- १) आपत्ती व्यवस्थापन कायदा 2005 चे कलम 30,33,34,41,व कलम 51
२) प्रधान सचिव, मदत व पुनर्वसन, महसुल व वने , मंत्रालय यांचेकडील पत्र दिनांक ५ फेब्रुवारी 2020
३) भारत सरकार, गृह मंत्रालय यांचे कडील पत्र क्रमांक 137/2018/FTS10548 दिनांक 4 फेब्रुवारी 2020

जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण,
जिल्हाधिकारी कार्यालय पुणे,
क्र.कक्ष/कोरोना विषाणू/104/2020.
पुणे, दिनांक :- 11 /03/2020.

## आदेश

**ज्या अर्थी,** आपत्ती व्यवस्थान कायदा 2005 मधील कलम 25 अन्वये जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाची स्थापना करण्यात आलेली आहे. व त्यातील पोट कलम २ (अ) नुसार जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकरी हे उक्त प्राधिकरणाचे पदसिध्द अध्यक्ष आहेत.

**आणि ज्या अर्थी,** आंतरराष्ट्रीय स्तरावर व देशांतर्गत कोरोना विषाणु संसर्ग बाधित रुग्ण आढळत आहे. तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावरुन व देशांतर्गत विमान प्रवासाद्वारे प्रवासी भारतात व इतरत्र प्रवास करीत आहे. त्यामुळे कोरोना विषाणुचे संशयित रुग्ण पुणे शहरातही आढळुन आल्याचे निदर्शनात आलेले आहे. यामुळे संसर्ग वाढण्याची शक्यता लक्षात घेता त्यावर तात्काळ नियंत्रण करणे व विषाणुच्या संसर्गात अधिक वाढ होवु न देता तात्काळ उपाय योजना आखणे आवश्यक आहे. सदर संशयित रुग्णांमुळे आपत्तीजनक परिस्थिती उदभवु नये यासाठी पुर्वतयारी करणे अगत्याचे झाले आहे.

**त्या अर्थी मी नवल किशोर राम, अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण तथा जिल्हाधिकरी,** पुणे जिल्हयात आपत्ती व्यवस्थापन कायदा अन्वये हे. उक्त पुर्वतयारी व प्रत्यक्ष अंमलबजावणीसाठी Incident Commander म्हणुन **डॉ. अशोक नंदापूरकर,** जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा रुग्णालय, पुणे **मो.नं.** 7507292181 व **डॉ. भगवान पवार,** जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, पुणे मो.नं. 8888611199 यांना सनियंत्रक म्हणुन नेमणुक करण्यात येत आहे. त्यानुसार प्रत्येक विभागाने आपल्या अधिनस्त अधिकारी व कर्मचारी यांना पुढिलप्रमाणे आदेशित करावे.

| अ.नं. | विभागाचे नाव | सनियंत्रकाचे नांव | पार पाडावयाच्या जबाबदा-या |
|---|---|---|---|
| 1 | गृह विभाग़ | 1. मा. पोलीस आयुक्त पुणे शहर, यांनी प्राधिकृत केलेले उपायुक्त,<br>2. मा. पोलीस आयुक्त पिंपरी चिंचवड यांनी प्राधिकृत केलेले उपायुक्त,<br>3. पोलीस अधिक्षक पुणे ग्रामीण, | • कोरोना विषाणुचा संसर्गाबाबत Social Media च्यामाध्यामातून अफवा, गैरसमज पसरविणा-यांवर योग्य ती कार्यवाही सायबर सेल मार्फत करावी. तसेच अफवांवर नियंत्रण ठेवावे.<br>• गर्दीच्या ठिकाणी आवश्यक ती जनजागृती करावी.<br>• परदेशी नागरीक अथवा परदेशातून प्रवास करून आलेले भारतीय नागरीक याबाबत संबंधित पोलीस स्टेशन प्रभारी यांना माहिती वेळोवेळी देण्याच्या सूचना देण्यात याव्यात.<br>• शासनाच्या मार्गदर्शक सूचनांप्रमाणे गर्दीचे सार्वजनिक कार्यक्रम आयोजित करणारे आयोजक यांना सदर कार्यक्रम आयोजित करू नये अथवा पुढे ढकलणेबाबत अवगत करावे. व जिल्हा रुग्णालयाशी समन्वय ठेवावा<br>• जिल्हा रूग्णालयाशी समन्वय ठेवावा. |

Scanned by CamScanner

| | | | |
|---|---|---|---|
| 2 | आरोग्य विभाग | उपसंचालक आरोग्य विभाग पुणे | • कोरोना विषाणुचा संसर्ग आजाराचा प्रसार, प्रतिबंध व उपाचार याबाबत सर्वसामान्य मध्ये जनजागृती करणे<br>• माहिती व प्रचार साहित्य आपल्या स्तरावर प्रसार करुन / दर्शनीय स्थळांवर लावावे त्यामुळे कमीत कमी वेळेत जास्त लोकांना करोना विषाणु बाबत माहिती मिळेल व विषाणुच्या प्रसारास वेळेत आळा घालणे शक्य होईल.<br>• सर्व विभागांशी समन्वय साधणे व दररोज अदयावत माहिती मा. विभागीय आयुक्त व जिल्हाधिकारी व माहिती कक्षास उपलब्ध करुन देणे. |
| 3 | आरोग्य विभाग | 1.जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा रुग्णालय, पुणे<br>2. जिल्हा आरोग्य अधिकारी, पुणे | • कोरोना विषाणुचा संसर्ग लक्षात घेता लघु कृती प्रमाणित कार्य पध्दती तयार करावी.<br>• कोरोना विषाणुचा संसर्ग जिल्हयात वाढु नये यासाठी उपाय योजना आखण्यात यावी.<br>• कोरोना विषाणुचा संसर्ग बाबत आरोग्य विभागाने तयार केलेली मार्गदर्शक पुस्तिकेचे तंतोतंत पालन करावे.<br>• स्वतंत्र वैद्यकीय पथके तयार करुन पर्ण वेळ तैनात ठेवावी.<br>• संशयित रुग्णांसाठी स्वतंत्र अॅब्युलनची व्यवस्था करण्यात यावी.<br>• कोरोना विषाणुचा संसर्ग बाबत जनजागृती करण्यात यावी.<br>• कोरोना विषाणुचा संसर्ग माहितीसाठी स्वतंत्र माहिती कक्ष व मदत केंद्राची स्थापना करावी.तसेच मदत केंद्र व माहिती केंद्र आपल्या विभागामार्फत 24 तास सुरू ठेवावे. सदर माहिती केंद्रात पूर्णवेळ उपलब्ध करुन द्यावे.<br>• राज्यस्तरीय नियंत्रण कक्ष क्रमांक व राष्ट्रीय कॉल सेंटर क्रमांक 91-11-23978046 या क्रमांकाची माहिती सर्व सामान्य नागरीकांपर्यत जिल्हा माहिती अधिकारी, पुणे यांचे मार्फत प्रसिध्दी देण्यात यावी.<br>• दैनंदिन प्रगती अहवाल जिल्हाधिकारी कार्यालयास सादर करावा.<br>• विमान तळावरुन प्रवाश्यांबददलची माहिती आरोग्य विभागास उपलब्ध होते त्यानसुार पुणे जिल्हयातील रुग्णांचा शोध घेवुन निरीक्षणाखाली ठेवावे व त्याबाबतचा अहवाल जिल्हाधिकारी कार्यालयासही सादर करावा.<br>• औषधे विक्रेते यांनी जास्त भावाने मास्क विक्री, औषधांची साठेबाजी, सदर बाबत चुकीचे समज पसरवणे इ. केल्यास तात्काळ कारवाई करावी.<br>• खाजगी डॉक्टरांची सेवा अधिग्रहित करणे तसेच खाजगी हॉस्पिटल मधील साधनसामुग्री अधिग्रहित करण्याचे अधिकार देण्यात येत आहे.<br>• झीगल्स, हस्तपत्रिका, पोस्टर्स, स्टीकर्स यांचे माध्यमातुन जनजागृती करावी.<br>• शासनाने वेळोवेळी दिलेल्या सुचनांचे पालन करावे व कार्यवाही करावी. |

Scanned by CamScanner

| | | | |
|---|---|---|---|
| | | | • आपत्ती व्यवस्थापन कायद्यातील कलम 30 अन्वये दिलेले असल्याने त्याचे पालन करणे संबधित प्रवासी यांना बंधनकारक आहे. त्याचे पालन करण्यात बाधा निर्माण करणा-या कोणत्याही व्यक्ती विरुध्द उक्त कायदयाच्या कलम 51 अनुसार यथोचित कारवाई करण्यात येईल.<br>• खाजगी रूग्णालय सहकार्य करत नसल्यास त्यांचेवर योग्य ती कार्यवाही करावी.<br>• उक्त नमुद परिस्थिती विचारात घेता, जिल्हयातील विविध रुग्णालये / दवाखाने यांना योग्य ते निर्देश वेळोवेळी देण्यात येवुन त्याची अंमलबजावणी बाबत योग्य ती कार्यवाही करावी.<br>• आपल्या अधिनस्त अधिकारी व कर्मचारी यांना प्रशिक्षित व मार्गदर्शन करावे.<br>• आवश्यक औषध साठा उपलब्ध करावा.<br>• गर्दीच्या ठिकाणी जनजागृती करावी.<br>• कोरोटाईन आणि आयसोलेशन युनिट स्थापन करावे. |
| 4 | महानगरपालिका/ नगरपालिका | 1. मा. आयुक्त, महानगरपालिका पुणे<br>2. मा. आयुक्त महानगरपालिका पिंपरी चिंचवड<br>3. सर्व मुख्याधिकारी नगरपालिका | • आपल्या अधिनस्त रूग्णालये यांचे मार्फत जनजागृती करण्यात यावी.<br>• वार्ड निहाय स्वच्छता ठेवावी. केरकचरा साचणार नाही याची दक्षता घ्यावी.<br>• आपल्या अधिनस्त रुग्णालयात कोरोंटाईन आयसोलेशन युनिट स्थापन करावे.<br>• राज्यस्तरीय नियंत्रण कक्ष क्रमांक ०२० – २६१२७३९४ व राष्ट्रीय कॉल सेंटर क्रमांक ९१- ११- २३९ ७८०४६ या क्रमांकाची माहिती सर्व सामान्य नागरिकांपर्यंत जिल्हा माहिती अधिकारी, पुणे यांचे मार्फत प्रसिद्धी देण्यात यावी.<br>• औषध विक्रेते यांनी जास्त भावाने मास्क विक्री,औषधांची साठेबाजी, संसर्गाबाबत चुकीचे समज पसरवणे इ. बाब निदर्शास आल्यास तात्काळ IC यांना माहिती द्यावी.<br>• स्वतंत्र वैद्यकिय पथके तयार करून पूर्ण वेळ तैनात ठेवावी .<br>• नागरिकांमध्ये खबरदारीची उपाययोजना योग्य ती जनजागृती प्रचाव व प्रसिद्धी देण्यात यावी.<br>• मदत केंद्र व माहिती केंद्र तात्काळ आपल्या विभागामार्फत २४ तास सुरु करावे.<br>• यासाठी स्वतंत्र नोडल अधिकारी यांची नियुक्ती करावी. |
| 5 | जिल्हा परिषद पुणे | मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद पुणे | • आपल्या अधिनस्त प्राथमिक आरोग्य केंद्रामार्फत जनजागृती करण्यात यावी.<br>• ग्रामस्तरावर स्वच्छता ठेवावी. केरकचरा साचणार नाही याची दक्षता घ्यावी.<br>• राज्यस्तरीय नियंत्रण कक्ष क्रमांक ०२० – |

Scanned by CamScanner

| | | | |
|---|---|---|---|
| | | | २६१२७३९४ व राष्ट्रीय कॉल सेंटर क्रमांक ९१- ११-२३९ ७८०४६ या क्रमांकाचीं माहिती सर्व सामान्य नागरिकांपर्यंत जिल्हा माहिती अधिकारी, पुणे यांचे मार्फत प्रसिद्धी देण्यात यावी.<br>• स्वतंत्र वैद्यकियपथकेतयार करून पूर्ण वेळ तैनात ठेवावी .<br>• नागरिकांमध्ये खबरदारीची उपाययोजना योग्य ती जनजागृती प्रचाव व प्रसिद्धी देण्यात यावी.<br>• यासाठी स्वतंत्र नोडल अधिकारी यांची नियुक्ती करावी.<br>• लघु प्रमाणित कार्य पद्धती तयार करावी.<br>• आरोग्य विभागातील सर्व अधिकारी व कर्मचारी यांना प्रशिक्षण व मार्गदर्शन करावे.<br>• मदत केंद्र व माहिती केंद्र तात्काळ आपल्या विभागामार्फत २४ तास सुरु करावे.<br>• अंगणवाडी व शाळांमध्ये या बाबतचे प्रबोधन करावे. |
| 6 | महसुल विभाग़ | 1. सर्व उपविभाग़ीय अधिकारी<br>2. सर्व तहसिलदार | • तालुका स्तरावर सेवाभावी संस्थाच्या माध्यमातून जनजागृती करावी.<br>• विपश्यना केंद्रावर येणाऱ्या परदेशी नागरिकांना रोखण्या बाबत योग्य ती कारवाई करावी<br>• आपले कार्यक्षेत्रात सर्व संबधित यंत्रणांशी समन्वय ठेवून आवश्यक त्या उपाय योजना कराव्यात.<br>• विविधसंस्था, संघटनावव्यक्तींकडुनप्राप्तमदतीने परदेशीय नागरिकांची माहिती संकलित करावी सदर माहिती जिल्हा रुग्णालय, पुणे यांना कळवावी.<br>• कायदा व सुव्यवस्थेवर लक्ष ठेवावे.<br>• राज्यस्तरीय नियंत्रण कक्ष क्रमांक ०२० – २६१२७३९४ व राष्ट्रीय कॉल सेंटर क्रमांक ९१- ११-२३९ ७८०४६ या क्रमांकाची माहिती सर्व सामान्य नागरिकांपर्यंत जिल्हा माहिती अधिकारी, पुणे यांचे मार्फत प्रसिद्धी देण्यात यावी. .<br>• अन्न प्रशासन यांचे माध्यमातून औषध विक्रेत्यांना समन्वयक बैठकीचे आयोजन करावे. |
| 7 | अन्न व प्रशासन विभाग़ | सह आयुक्त, अन्न व प्रशासन विभाग, | • औषध विक्रेते यांनी जास्त भावाने मास्क विक्री,औषधांची साठेबाजी, संसर्गाबाबत चुकीचे समज पसरवणे इ. बाब निदर्शास आल्यास तात्काळ IC यांना माहिती द्यावी. व योग्य ती कार्यवाई करावी.<br>• सर्व औषध विक्रेते दुकानांची तपासणी करण्यात यावी , त्यांचे माध्यमातून नागरिकांमध्ये जनजागृती करण्यात यावी. औषध विक्रेत्यांना कोरोना संसर्गाबाबत जाणीव करून द्यावी.<br>• औषध विक्रेत्यांना समन्वयक बैठकीचे आयोजन करावे. |

Scanned by CamScanner

| | | | |
|---|---|---|---|
| ८ | संचालक, औद्योगिक सुरक्षा वआरोग्य संचालक, शिक्षण अधिकारी, प्राथमिक माध्यमिक, रेडक्रॉस / लायन्स क्लब / रोटरीक्लब / विपश्यना केंद्र व्यवस्थापक इतर सेवाभावी संस्था | सर्व विभाग प्रमुख | • आपल्या स्तरावरुन सेवाभावी संस्थाच्या माध्यमातून जनजागृती करावी.<br>• औद्योगिक क्षेत्रातील व्यवसायिक व्यवसायानिमित्त भेटी देत असल्यास त्यांना रोखण्या बाबत योग्य ती कार्यवाई करावी.<br>• राज्यस्तरीय नियंत्रण कक्ष क्रमांक ०२० – २६१२७३९४ व राष्ट्रीय कॉल सेंटर क्रमांक ९१- ११- २३९ ७८०४६ या क्रमांकाची माहिती सर्व सामान्य नागरिकांपर्यंत जिल्हा माहिती अधिकारी, पुणे यांचे मार्फत प्रसिद्धी देण्यात यावी.<br>• जिल्हा रुग्णालय यांचे सोबत समन्वय ठेवणे.<br>• प्रशासनाससर्वोतोपरीलागणारेसहकार्यकरावे.<br>• शालेय विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती करावी. |
| 9 | जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय | जिल्हा माहिती अधिकारी पुणे | • सर्व प्रसार माध्यमांशी समन्वय ठेवणे<br>• आरोग्य उपसंचालक व सर्व जिल्हा शल्य चिकित्सक यांच्याकडील अदयावत माहिती तसेच जिल्हा प्रशासनाकडुन नागरीकांना वेळोवेळी करण्यात येणाऱ्या अहवानास प्रसिध्दी देणे |

वरील प्रमाणे नियुक्त अधिका-यांनी त्यांचे अधिनस्थ मनुष्यबळ व साधन सामुग्रीचा यथोचित वापर करुन त्यांना सोपविण्यात आलेली जबाबतदारी पार पाडावी. आपत्ती व्यवस्थापन कायदा 2005 अन्वये आपले अधिनस्त सर्व अधिकारी व कर्मचारी यांच्या सेवा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण यांचे कडेस अधिग्रहीत करण्यात आलेल्या आहेत याची सर्वांना जाणीव करुन दयावी. वर नमुद सर्व विभागांनी जबाबदारीच्या अनुषंगाने वेळोवेळी आवश्यक ती कार्यवाही करावी आणि दैनंदिन अहवाल जिल्हा नियंत्रण कक्षास सादर करणेत यावा.

( नवल किशोर राम)
**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण,**
**जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे**

**प्रत:-** १. मा.प्रधान सचिव, मदत व पुनर्वसन मंत्रालय, मुंबई यांना माहितीस्वत सविनय सादर
२. मा.विभागीय आयुक्त, पुणे विभाग यांचेकडेस माहितीस्तव सविनय सादर
३. मा.संचालक, आपत्ती व्यवस्थापन प्रभाग, मंत्रालय, मुंबई 32 यांचेकडेस माहितीस्तव सविनय सादर
४. आयुक्त, महानगर पालिका, पुणे / पिंपरी चिंचवड यांना माहितीस्तव सस्नेह अग्रेषित
५. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, पुणे यांचेकडे योग्य त्या कार्यवाहीसाठी सस्नेह अग्रेषित.
6. सर्व उपविभागीय अधिकारी/तहसिलदार/ मुख्याधिकारी, नगरपालिका यांजकडे पुढिल कार्यवाहीकामी रवाना.
7. सह आयुक्त, अन्न व औषध प्रशासन विभाग, पुणे
8. सर्व संबंधितांस.

Scanned by CamScanner